महाराष्ट्र शासन

क्रमांकः संकीर्ण-२०१८/प्र.क्र.०१/सेवा-५
वित्त विभाग, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा मार्ग, मंत्रालय, विस्तार,
मुंबई ३२.
दिनांक: ३१ जानेवारी, २०१८

<u>संदर्भ-</u>

1) शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआरव्ही २००४/प्र.क्र.१५/१२, दिनांक २५.०५.२००६
2) शासन अधिसचूना, सामान्य प्रशासन विभाग, क्र. पीओडी-१००७/प्र.क्र.९/१८(र. व का.), दिनांक १४.११.२०१३
3) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.संकीर्ण २०१२/प्र.क्र.५४/१८(र. व का.), दि.११.०८.२०१४

कार्यालयीन आदेश

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ हा राज्यात लागू करण्यात आलेला आहे. सदर अधिनियमाच्या कलम ९(१) व (२) तसेच शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध नियम २०१३ तयार करण्यात आलेले असून ते दिनांक १४ नोव्हेंबर, २०१३ च्या अधिसूचनेद्वारे राज्यात लागू करण्यात आलेले आहेत. त्यातील कलम ६ अंतर्गत विभागाशी / कार्यालयाशी संबंधित सर्व बाबींवर अंतिम निर्णय घेण्याच्या दृष्टीने प्रकरणे सादर करणाऱ्या अधिकाऱ्यांचे शक्यतो तीन स्तर निर्धारित करण्याचे निदेश देण्यात आलेले आहेत.

त्यानुषंगाने कार्यासनाशी संबंधित विषयाच्या बाबतीत सोबतच्या विवरणपत्रात दर्शविल्याप्रमाणे निर्णय घेण्यासाठी सादरीकरणाचे स्तर निश्चित करण्यात येत आहेत. तथापि, वरीष्ठ अधिकाऱ्यांचे निदेश असल्यास किंवा काही विशिष्ट अपवादात्मक प्रकरणी आवश्यकता भासल्यास प्रकरणपरत्वे योग्य तो बदल करण्यात येईल. तसेच धोरणात्मक बाबींच्या प्रकरणात दि.११.०८.२०१४ च्या परिपत्रकात नमूद केल्यानुसार सादरीकरणाचे तीनपेक्षा अधिक स्तर असतील.

सदर कार्यालयीन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०१३११५०७५४९९०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Bhalchandra Jagannath Gadekar

Digitally signed by Bhalchandra Jagannath Gadekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Finance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=93c75178c3c4e1daaeb069f4e437a48fd302aabd765450129e4447d5a1da1f2a, serialNumber=d2671e08dbf49e6a42b865d026c3f07bc1eb8254056eab8fa6b4b0fb72dd47ba, cn=Bhalchandra Jagannath Gadekar
Date: 2018.01.31 15:13:39 +05'30'

(भा. ज. गाडेकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. अ.मु.स.(वित्त) / अ.मु.स.(वि.सु.) / प्र.स.(व्यय) / प्र.स.(ले. व को.) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
२. उप सचिव(आस्थापना), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
३. उप सचिव(र. व का.), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
४. निवडनस्ती

वित्त विभाग / सेवा-५

विवरणपत्र

शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध नियम २०१३ मधील नियम ४ अंतर्गत कार्यासनाशी संबंधित बाबींवर अंतिम निर्णय घेण्याच्या दृष्टीने प्रकरणे सादर करण्याबाबत अधिकारांचे तीन स्तर निर्धारीत करणे.

अ.क्र.	कार्यासनाकडून हाताळले जाणारे कामकाज	सादरीकरणाचे तीन स्तर			अंतिम निर्णय घेण्यास सक्षम प्राधिकारी	आदेश निर्गमित करण्यास सक्षम प्राधिकारी	अभिप्राय
१	२	३	४	५	६	७	८
१	विधानमंडळ कामकाजविषयक प्रकरणे.	स.क.अ./ क.अ. / अ.स.	उ.स./स.स.	प्र.स.(ले. व को.) /अ.मु.स.(वित्त)	मा.मंत्री (वित्त)	अ.स. / उ.स.	-----
२	न्यायालयीन बाबी / मा. लोक आयुक्त यांचेकडील प्रकरणे	स.क.अ./ क.अ. / अ.स.	उ.स./स.स.	प्र.स.(ले. व को.) /अ.मु.स.(वित्त)	प्र.स.(ले. व को.) /अ.मु.स.(वित्त)	अ.स. / उ.स.	-----
३	लोकप्रतिनिधींकडून प्राप्त संदर्भ	स.क.अ./ क.अ. / अ.स.	उ.स./स.स.	प्र.स.(ले. व को.) /अ.मु.स.(वित्त)	प्र.स.(ले. व को.) /अ.मु.स.(वित्त)	अ.स. / उ.स.	-----
४	केंद्र सरकार तसेच इतर राज्य सरकार व इतर विभागाशी पत्रव्यवहार	स.क.अ./ क.अ. / अ.स.	उ.स./स.स.	प्र.स.(ले. व को.) /अ.मु.स.(वित्त)	प्र.स.(ले. व को.) /अ.मु.स.(वित्त)	अ.स. / उ.स.	-----
५	लेखा परीक्षा विषयक प्रकरणे.	स.क.अ./ क.अ. / अ.स.	उ.स./स.स.	प्र.स.(ले. व को.) /अ.मु.स.(वित्त)	प्र.स.(ले. व को.) /अ.मु.स.(वित्त)	अ.स. / उ.स.	-----
६	इतर विभागांकडून प्राप्त अनौपचारीक संदर्भ	स.क.अ./ क.अ. / अ.स.	उ.स./स.स.	प्र.स.(ले. व को.) /अ.मु.स.(वित्त)	प्र.स.(ले. व को.) /अ.मु.स.(वित्त)	------	-----